



सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक २३ • बुधवार दि.१४ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.


# दुष्काळग्रस्तांसाठी चार मोठ्या घोषणा:दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना ५ हजारांची मदत!

## आणखी ४० तालुक्यांचा समावेश;चारा हमीभावाने खरेदी,गरजेनुसार टँकर



मुंबई/प्रतिनिधी-दिवाळी-पूर्वी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची आर्थिक मदत, राज्यातील दुष्काळी तालुक्यांची संख्या ३६५ वरून ३०५ करण्यात आली असून, नव्याने ४० तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. रब्बी हंगामात चाऱ्याची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांकडून चारा हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेण्याची तयारी सरकारने केली आहे. दुष्काळी भागात पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यकतेनुसार टँकर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही माहिती दिली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर यापूर्वी २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. मात्र, काही तालुक्यांतून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ट्रिगर-१ आणि ट्रिगर-२ निकषांचा पुन्हा आढावा घेतल्यानंतर दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०५ पर्यंत वाढविण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दुष्काळग्रस्त भागांना दुष्काळ निवारणाच्या १२ सवलती देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**रब्बी हंगामातील चाऱ्याला आधार**

दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत असल्याने सरकारने चारा उपलब्धतेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. काही भागांत केवळ ९० दिवस पुरेल इतका चारा उपलब्ध आहे, तर काही ठिकाणी सहा ते सात महिन्यांचा चारा उपलब्ध असल्याचे आढाव्यातून समोर आले आहे. त्यामुळे आगामी काळात चाऱ्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी नियोजन करण्यात येत आहे.

धरण क्षेत्राच्या परिसरात चाऱ्याची लागवड करण्यावर भर देण्यात येणार आहे. विहिरींमध्ये पाणी उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात ज्वारी किंवा चारा पिकांची लागवड करावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला चारा सरकार हमीभावाने खरेदी करण्याबाबत चर्चा झाली असून, त्यासंदर्भातील निर्णय लवकरच जाहीर केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

**पिण्याच्या पाण्यासाठी गरजेनुसार टँकर**

मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांत भूजलपातळी खालावल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. मराठवाड्यातील बहुतांश भागांमध्ये निरीक्षण विहिरींमधील पाण्याची पातळी तीन मीटरपेक्षा खाली गेल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. अशा परिस्थितीत ऑक्टोबर-नोव्हेंबरपासून टँकरची आवश्यकता भासू शकते. त्यामुळे आवश्यकतेनुसार टँकर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

टँकरच्या पाणीपुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जीपीएस प्रणालीद्वारे त्यांचे निरीक्षण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय आणि अवैध उपसा रोखण्यासाठी सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. आतापर्यंत १६ हजार बेकायदा नळजोडण्या तोडण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. यापुढेही अवैध पाणीउपसा आढळल्यास संबंधित जोडण्या तोडण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक शुल्कमाफीच्या शासन निर्णयातील काही अटींमुळे शुल्कमाफीचा पान ४ वर

# खून प्रकरणातील दोन वर्षांपासून फरार आरोपीस पोलीसांनी केली अटक



नांदेड/प्रतिनिधी-खुनाच्या घटनेतील दोन वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीस मध्यप्रदेशातील भोपाळ येथुन पोलीसांनी अटक केली आहे.

या प्रकरणी माहिती अशी की, शिवम सुरज गायकवाड रा.हमालपूरा,नांदेड या तरुणाचे सिमरण नांगरे या तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. दोघांनीही आंतरजातीय विवाह केला होता. सिमरणने आंतरजातीय विवाह केल्याचा राग मनात धरुन देवांश उर्फ देवासिंग करणसिंग शिक्करवार (वय २८) रा. अबचलनगर, नांदेड व परविंदरसिंघ लचमणसिंघ चव्हाण रा.भगतसिंग रोड, शहीदपूरा, नांदेड हे दोघे जण शिवम गायकवाडला जीवे मारण्याच्या धमक्या सतत देत होते. दि.२० सप्टेंबर रोजी रात्री शिवम गायकवाड यास गाठून परविंदरसिंग चव्हाण व देवांश उर्फ देवासिंग करणसिंग शिक्करवार यांनी त्याच्यावर तलवारीने वार केले. डोक्यावर व मानेवर वार असल्याने शिवमचा जागीच मृत्यू झाला. पुरावा नष्ट करण्यासाठी शिवमचा मृतदेह गोदावरी नदीच्या पात्रात फेकुन दिला. याप्रकरणी करण गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. पोलीसांनी देवांश उर्फ देवासिंग करणसिंग शिक्करवार यास अटक केली. दुसरा आरोपी परविंदरसिंग चव्हाण हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. भोपाळ येथील कारागृहात परविंदरसिंग चव्हाण हा दुसऱ्या नावाने बंदिस्त असल्याची गुप्त माहिती इतवारा उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांना मिळाली. त्यांनी फौजदार रवींद्र तारु यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांचे एक पथक भोपाळला रवाना केले. पोलीसांनी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करुन परविंदरसिंग चव्हाण यास ताब्यात घेतले. तो बलकारसिंग लक्ष्मणसिंग या नावाने भोपाळ व परिसरात वास्तव्य करीत असल्याचे पोलीस चौकशीत निष्पन्न झाले.

# एमपीएससी सचिवपदी सौरभ कटियार

पुणे:महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणावरून विद्यार्थ्यांनी आंदोलन केल्यानंतर आयोगात प्रशासकीय फेरबदल करण्यात आले आहेत. सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली झाल्यानंतर मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. दरम्यान, आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार रजेवर गेल्याने अध्यक्षपदाच्या अतिरिक्त कार्यभाराबाबत निर्णय होणे बाकी आहे. त्यामुळे आता नव्या अध्यक्षांची नियुक्ती कधी होणार, याकडे स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

एमपीएससी परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणावरून पुण्यात विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडले होते. तब्बल बारा दिवस चाललेल्या या आंदोलनात आयोगाच्या कारभारातील पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी सौरभ कटियार यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. १२ ऑक्टोबर रोजी मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि आ.रोहित पवार यांच्यात झालेल्या भेटीनंतर सरकारची भूमिका विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली होती. अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी चौकशी पूर्ण होईपर्यंत पदावर कार्यरत न राहता रजेवर जाण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

# चौथ्या माळेला श्री रेणुका मातेच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी



माहूर/प्रतिनिधी-माहूरगडावरील श्री रेणुका देवीच्या शारदीय नवरात्रोत्सवाची भक्तिमय वातावरणात धूम सुरू असून, बुधवारी (ता.१४) चौथ्या माळेला देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. मागील तीन दिवसांच्या तुलनेत बुधवारी भाविकांची संख्या वाढल्याने मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी श्री रेणुका मातेच्या समोर सफरचंदांची आकर्षक आरास मांडण्यात आली होती.

बुधवारी सकाळी श्री रेणुका देवीच्या पूजाविधीला प्रारंभ झाला. सकाळी साडेअकरा वाजता घटाला चौथी माळ बांधण्यात आली. त्यानंतर नैवेद्य, तांबूल आणि विडा अर्पण करून महाआरती करण्यात आली. संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय कान्नव, आशिष जोशी, अरविंद देव यांच्यासह अभिजीत फांदाडे आणि अनिल कान्नव यांनी महाआरती केली. प्रसाद कान्नव यांच्या हस्ते कुमारिका पूजन करण्यात आले. यानंतर मंदिर परिसरात छबिना काढण्यात आला. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने मंदिरात विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी दिवसभर संगीत सेवेचे कार्यक्रम पार पडले. सुवर्णा सचिन कुलकर्णी यांच्या कीर्तन कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करून कीर्तनाला सुरुवात करण्यात आली. नारायणी भजनी मंडळ, पुसद यांच्या वतीने सविता पारटकर यांच्या पान ४ वर

# आदिवासी आशा कार्यकर्तीच्या तक्रारीची राष्ट्रीय जनजाती आयोगाकडून दखल

## जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस;पंधरा दिवसांत खुलासा देण्याचे निर्देश

किनवट/प्रतिनिधी-जलधरा येथील अत्यंत गरीब कुटुंबातील आदिवासी महिला आशा कार्यकर्ती श्रीमती रेणुका श्रीराम पाचपुते यांना कोणतीही पूर्वसूचना वा नोटीस न देता मनमानी पद्धतीने नोकरीवरून काढून टाकल्याचा आणि तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडून झालेल्या छळासंबंधी श्रीमती पाचपुते यांनी आता दिल्ली येथील 'राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाकडे' धाव घेतली आहे. उक्त प्रकरणाची आयोगाने गंभीर दखल घेऊन नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

जलधारा येथील आदिवासी महिला श्रीमती रेणुका पाचपुते यांनी १२ ऑगस्ट २०२६ रोजी आयोगाकडे धाव घेऊन तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध आणि अन्यायाविरुद्ध राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३३८-क, अंतर्गत मिळालेल्या घटनात्मक अधिकारांचा वापर करत प्रकरणाची अधिकृत चौकशी सुरू केल्याचे प्राप्त पत्रावरून स्पष्ट होते. आयोगाचे संशोधन अधिकारी अंकित कुमार सेन यांच्या स्वाक्षरीने ही नोटीस जारी करण्यात आली आहे. या नोटीसीद्वारे नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत की, नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत या प्रकरणावर काय कारवाई करण्यात आली, याचा सविस्तर अहवाल टपालद्वारे किंवा प्रत्यक्ष उपस्थित राहून आयोगाकडे सादर करावा.

**उत्तर न दिल्यास 'समन्स' बजावण्याचा इशारा**

आयोगाने दिलेल्या मुदतीत जिल्हा प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही, तर संविधानाच्या अनुच्छेद ३३८-क, मधील दिवाणी न्यायालयाच्या अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकाऱ्यांना पान ४ वर




# दुष्काळ व सणासुदीत दिलासा!

**एका बाजूला दुष्काळाचे संकट, दुसऱ्या बाजूला महागाईची झळ; अशा परिस्थितीत सर्वसामान्यांच्या खिशाला आधार देणाऱ्या निर्णयांची आज खरी गरज आहे.भारतीय अर्थव्यवस्थेत डिजिटल व्यवहारांनी मोठी क्रांती घडवून आणली आहे. हातात रोख रक्कम नसली, तरी मोबाईलच्या माध्यमातून काही क्षणांत पैशांची देवाण-घेवाण करता येते. भाजी विक्रेत्यापासून मोठ्या व्यापाऱ्यापर्यंत आणि सामान्य ग्राहकापासून नोकरदारांपर्यंत यूपीआयने प्रत्येकाच्या जीवनात महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. अशा परिस्थितीत यूपीआय शुल्काला केंद्र सरकारने तात्पुरती स्थगिती दिल्याच्या निर्णयाकडे ग्राहक आणि व्यापाऱ्यांना दिलासा देणारे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. दसरा-दिवाळीच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाचे महत्त्व अधिक आहे. मात्र, या निर्णयाकडे केवळ आर्थिक सवलत म्हणून न पाहता, आजच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीच्या संदर्भातही पाहण्याची गरज आहे.दसरा आणि दिवाळी हे आनंदाचे, नवचैतन्याचे आणि आशेचे सण आहेत. या काळात घराघरांत दिवे लागतात, बाजारपेठा फुलतात, मिठाईची दुकाने सजतात आणि नवीन वस्तू खरेदी करण्याची लगबग सुरू होते. पण या झगमगाटाच्या पलीकडे एक वेगळे वास्तवही आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाची अनिश्चितता, पावसातील खंड आणि दुष्काळसदृश परिस्थिती यांमुळे शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर ताण निर्माण होऊ शकतो. ज्या शेतकऱ्याच्या शेतात पिके उभी राहण्याची अपेक्षा होती, त्याच शेतकऱ्याला पाण्याची चिंता सतावत असेल, तर त्याच्यासाठी सणाचा आनंद किती सहज शक्य आहे? शेतकऱ्याच्या घरातील दिवाळी ही केवळ खरेदीवर अवलंबून नसते; ती त्याच्या कष्टांना मिळणाऱ्या मोबदल्यावर, पिकांच्या उत्पादनावर आणि कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेवर अवलंबून असते. पाऊस कमी पडला, पीक हातचे गेले किंवा उत्पन्न घटले, तर घरातील मुलांचे शिक्षण, औषधोपचार, जनावरांचा चारा आणि दैनंदिन गरजा यांचा प्रश्न अधिक गंभीर होतो. अशा वेळी सणासाठी खर्च करायचा तरी कसा, हा प्रश्न अनेक कुटुंबांसमोर उभा राहू शकतो.आज किराणा दुकान, भाजी मंडई, औषधालय, कपड्यांचे दुकान अशा ठिकाणी यूपीआयचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. ग्राहकांसाठी ही सुविधा सोयीची, तर व्यापाऱ्यांसाठी व्यवहारांची नोंद ठेवण्यास उपयुक्त आहे. मात्र, डिजिटल व्यवहारांवर अतिरिक्त शुल्क लागू झाल्यास त्याचा भार ग्राहक किंवा व्यापाऱ्यांवर पडण्याची शक्यता असते. त्यामुळे शुल्कासंबंधी योग्य धोरण सर्वांसाठी महत्त्वाचे आहे. दसरा-दिवाळीच्या काळात आधीच घरखर्च वाढतो. ग्रामीण भागात उत्पन्नाची अनिश्चितता आणि शहरी भागात महागाई यांचा सामना करणाऱ्या सामान्य माणसासाठी प्रत्येक रुपया मोलाचा असतो. अशा परिस्थितीत अनावश्यक आर्थिक भार टाळणारे निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहेत. तथापि, यूपीआय शुल्कावरील स्थगिती नेमकी कोणत्या शुल्काला आणि कोणत्या व्यवहारांना लागू आहे, हे अधिकृतरीत्या स्पष्ट होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आपण दिवाळीसाठी हजारो रुपयांची खरेदी करत असताना आपल्या आजूबाजूला असा एखादा शेतकरी आहे का, ज्याच्या शेतात पाणी नाही? एखादे कुटुंब आहे का, जे यंदा मुलांना नवीन कपडे घेऊन देण्यापूर्वी दहा वेळा विचार करत आहे? एखादा छोटा दुकानदार आहे का, जो सणासुदीच्या गर्दीतही वाढत्या खर्चाचा हिशेब जुळवण्याचा प्रयत्न करत आहे? हे प्रश्न केवळ सरकारला विचारण्याचे नाहीत; ते प्रत्येकाने स्वतःलाही विचारण्याचे आहेत. सण म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, महागड्या वस्तूंची खरेदी किंवा मोठ्या जाहिराती नव्हेत. सणाचा खरा अर्थ दुसऱ्याच्या आयुष्यात आनंदाचा एक दिवा लावण्यात आहे. शक्य असेल तर स्थानिक शेतकरी, लघुउद्योजक, कारागीर आणि छोट्या दुकानदारांकडून खरेदी करून त्यांच्या अर्थचक्राला हातभार लावणे, गरजू कुटुंबांना मदत करणे आणि अन्नाची नासाडी टाळणे, हीदेखील सण साजरा करण्याची अर्थपूर्ण पद्धत ठरू शकते. यूपीआय शुल्कावरील स्थगिती हा विषय महत्त्वाचा असला, तरी ग्रामीण संकटाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. दुष्काळसदृश परिस्थितीत पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा, रोजगार, पीकविमा, नुकसान भरपाई आणि आवश्यक शासकीय मदत यांना प्राधान्य मिळाले पाहिजे. गरज असलेल्या भागांमध्ये परिस्थितीचे अचूक मूल्यांकन करून मदत वेळेवर पोहोचवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्याचबरोबर डिजिटल व्यवहारांबाबत पारदर्शक आणि ग्राहकहिताचे धोरणही आवश्यक आहे.शेवटी, दिवाळीच्या दिव्यांनी केवळ आपली घरे उजळून चालणार नाहीत; समाजातील निराशेचे अंधारही दूर झाले पाहिजेत. यूपीआय शुल्काला स्थगितीमुळे काही आर्थिक दिलासा मिळू शकतो; पण दुष्काळाच्या सावटाखाली जगणाऱ्या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी अधिक व्यापक प्रयत्नांची गरज आहे. यंदा दिवाळी साजरी करताना एक प्रश्न स्वतःला विचारूया आपल्या घरातील दिव्यांचा प्रकाश आपल्या दारापलीकडेही पोहोचतो आहे का? कारण खऱ्या अर्थाने समृद्ध समाज तोच, जिथे एका घरातील आनंद दुसऱ्या घराच्या दुःखाकडे डोळेझाक करत नाही. सणाचा खरा विजय तेव्हाच होईल, जेव्हा डिजिटल भारताच्या प्रगतीसोबत शेतकरी, कामगार, छोटे व्यापारी आणि सामान्य नागरिक यांच्या जीवनातही आशेचा नवा प्रकाश निर्माण होईल.**

# धम्मचक्र प्रवर्तनःमानवी प्रतिष्ठेच्या परिवर्तनाची ऐतिहासिक पहाट



**डॉ.राजेंद्र बगाटे**

दि.१४ ऑक्टोबर हा दिवस भारतीय समाजाच्या इतिहासातील सामाजिक जागृती, स्वाभिमान आणि समतेच्या नव्या पर्वाचे स्मरण करून देतो. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि आपल्या लाखो अनुयायांना धम्मदीक्षा दिली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ धर्मांतराच्या घटनेपुरते मर्यादित नाही. तो अन्यायकारक सामाजिक रचनेला नकार देऊन मानवी प्रतिष्ठा, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि विवेकनिष्ठ जीवनाचा स्वीकार करण्याचा संकल्प आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मदीक्षेच्या माध्यमातून समाजाला नवी वैचारिक दिशा दिली. माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर किंवा जातीवर ठरत नसून त्याच्या मानवी अस्तित्वावर ठरले पाहिजे, हा विचार या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी होता. त्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिन हा भूतकाळातील एका महत्त्वपूर्ण घटनेचा स्मृतिदिन असण्याबरोबरच वर्तमानातील सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.

भारतीय समाजात जातिभेद आणि अस्पृश्यतेमुळे अनेक पिढ्यांना सामाजिक अन्यायाचा सामना करावा लागला. जन्माच्या आधारावर व्यक्तीचे स्थान ठरविणाऱ्या व्यवस्थेमुळे काही समूहांना शिक्षण, सार्वजनिक पाणवठे, धार्मिक स्थळे आणि प्रतिष्ठेच्या संधींपासून दूर ठेवण्यात आले. व्यक्तीचे ज्ञान, कर्तृत्व आणि नैतिकता यांपेक्षा तिची जात महत्त्वाची मानली गेली. परिणामी, सामाजिक विषमता केवळ आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रापुरती मर्यादित राहिली नाही, तर ती मानवी संबंधांमध्ये आणि व्यक्तीच्या आत्मभानातही रुजली. अशा परिस्थितीत समानतेचा आग्रह धरणे म्हणजे प्रस्थापित सामाजिक समजुतींना आव्हान देणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या व्यवस्थेचे स्वरूप स्वतः अनुभवले आणि तिच्या कारणांचा सखोल अभ्यास केला. त्यांनी अन्यायाला नशिबाचा भाग मानण्याऐवजी त्याविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या कार्यामुळे वंचित समूहांमध्ये आपल्या अधिकारांविषयी जागरूकता निर्माण झाली आणि सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा पाया शिक्षण, संघटन आणि संघर्ष या तत्त्वांवर उभा होता. प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण प्राप्त करून त्यांनी अर्थशास्त्र, कायदा, राज्यव्यवस्था आणि समाजरचना यांचा अभ्यास केला. त्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग वैयक्तिक प्रगतीपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक परिवर्तनासाठी केला. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहातून सार्वजनिक पाण्यावर समान हक्काचा प्रश्न उपस्थित झाला. नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनाने धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील भेदभावाला आव्हान दिले. या आंदोलनांचे महत्त्व केवळ एखाद्या ठिकाणी प्रवेश मिळविण्यात नव्हते, तर समान नागरिकत्व आणि मानवी प्रतिष्ठेचा अधिकार अधोरेखित करण्यात होते. समाजातील सार्वजनिक साधनसंपत्ती, शिक्षण आणि संधी यांवर सर्वांचा समान हक्क असला पाहिजे, हा विचार या संघर्षांतून व्यक्त झाला. सामाजिक न्यायासाठी केवळ सहानुभूती पुरेशी नसते; अधिकारांची मान्यता आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आवश्यक असते, हे डॉ. आंबेडकर यांच्या चळवळीने दाखवून दिले.

सामाजिक परिवर्तनासाठी बाह्य परिस्थितीत बदल घडविण्याबरोबरच व्यक्तीच्या विचारविश्वातही परिवर्तन घडले पाहिजे, अशी डॉ. आंबेडकर यांची भूमिका होती. जातीय विषमता टिकवून ठेवणाऱ्या रूढी, पूर्वग्रह आणि अंधानुकरणाचा चिकित्सक विचार केल्याशिवाय समाजाला मुक्ती मिळू शकत नाही. व्यक्तीने स्वतःच्या परिस्थितीचे आकलन करावे, अन्याय ओळखावा आणि त्याविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य विकसित करावे, हा त्यांच्या विचारांचा महत्त्वाचा भाग होता. स्वाभिमान म्हणजे दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ असल्याची भावना नव्हे, तर स्वतःला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे याची जाणीव आणि इतरांच्या प्रतिष्ठेचा आदर होय. अशा स्वाभिमानातून व्यक्तीमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि सामाजिक जीवनातील सहभाग वाढतो. समतेचा विचार स्वीकारणारा समाज कोणत्याही व्यक्तीला तिच्या जन्माच्या आधारावर कमी लेखत नाही. म्हणूनच सामाजिक न्यायाची सुरुवात प्रत्येक व्यक्तीला समान मानवी प्रतिष्ठा देण्यापासून होते. १९३५ मध्ये येवला जि. नाशिक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराचा निर्धार जाहीर केला. हा निर्णय त्यांच्या दीर्घ वैचारिक चिंतनाचा आणि सामाजिक अनुभवांचा परिणाम होता. धर्माचा मानवी जीवनावर, सामाजिक संबंधांवर आणि नैतिक मूल्यांवर होणारा परिणाम त्यांनी तपासला. त्यांनी विविध धार्मिक परंपरा आणि तत्त्वज्ञानांचा अभ्यास केला. त्यांच्या दृष्टीने धर्माने माणसाला विवेकशील जीवनाची प्रेरणा द्यावी, नैतिक आचरणाला महत्त्व द्यावे आणि मानवी प्रतिष्ठेच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करावे. गौतम बुद्धांच्या धम्मात त्यांना प्रज्ञा, करुणा, समता आणि नैतिकतेचा समन्वय आढळला. त्यामुळे बौद्ध धम्माचा स्वीकार हा केवळ धार्मिक ओळख बदलण्याचा निर्णय नव्हता, तर अन्यायकारक सामाजिक संकेतांना नकार देऊन मानवी मूल्यांवर आधारित जीवनाचा स्वीकार होता. या निर्णयामागे आत्मसन्मान, सामाजिक मुक्ती आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीची व्यापक आकांक्षा होती.

दि.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भदंत चंद्रमणी महास्थविर यांच्याकडून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि त्यानंतर आपल्या अनुयायांना धम्मदीक्षा दिली. ही घटना भारतीय सामाजिक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरली. लाखो लोकांच्या सहभागातून व्यक्त झालेल्या या परिवर्तनाने स्वाभिमान आणि नव्या सामाजिक ओळखीचा संदेश दिला. दीक्षाभूमी हे आज समता, सामाजिक जागृती आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रतीक बनले आहे. धम्मदीक्षेमुळे अनेकांना आपल्या जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा मिळाली. आपणही समाजाचे समान सदस्य आहोत, आपल्याला शिक्षण आणि प्रगतीचा अधिकार आहे आणि समाजाच्या परिवर्तनात आपली भूमिका महत्त्वाची आहे, अशी जाणीव दृढ झाली. धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा ऐतिहासिक आशय याच सामूहिक आत्मभानात सामावलेला आहे. या दिवसातून मिळणारी प्रेरणा आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी या घटनेचा सामाजिक आणि वैचारिक अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. धम्मदीक्षेच्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारलेल्या बावीस प्रतिज्ञांना या परिवर्तनात विशेष महत्त्व आहे. या प्रतिज्ञांमधून अंधानुकरणाला नकार, विषमता टिकविणाऱ्या प्रथांपासून दूर जाण्याचा निर्धार आणि बुद्धांच्या धम्मातील नैतिक मूल्यांचा स्वीकार व्यक्त होतो. प्रतिज्ञा उच्चारणे हा परिवर्तनाचा आरंभ असू शकतो; मात्र त्या प्रतिज्ञांनुसार जगणे ही त्यांची खरी कसोटी आहे. जातीय श्रेष्ठत्वाची भावना टाळणे, अन्यायाला पाठिंबा न देणे, विवेकाच्या आधारे निर्णय घेणे आणि सर्व व्यक्तींशी सन्मानाने वागणे या मूल्यांचा व्यवहारात स्वीकार करणे आवश्यक आहे. धम्माचा स्वीकार केल्यानंतर सामाजिक प्रश्न आपोआप सुटतात असे नाही. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी आवश्यक असते. प्रतिज्ञा व्यक्तीला आपल्या विचारांचे आणि वर्तनाचे परीक्षण करण्याची संधी देतात. आपल्या कृतींमुळे इतरांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचत नाही ना, आपण भेदभावाला नकळत प्रोत्साहन देत नाही ना, असे प्रश्न स्वतःला विचारणे हीदेखील परिवर्तनाची महत्त्वाची प्रक्रिया आहे. गौतम बुद्धांच्या धम्मात प्रज्ञा, करुणा आणि शील या मूल्यांना मध्यवर्ती स्थान आहे. प्रज्ञा म्हणजे विवेकपूर्ण विचारातून सत्याचा शोध घेणे. करुणा म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवून त्याच्या कल्याणासाठी संवेदनशीलतेने प्रयत्न करणे. शील म्हणजे नैतिक आचरण आणि आपल्या कृतींबद्दल जबाबदारीची जाणीव ठेवणे. ही मूल्ये व्यक्तीला स्वतःच्या हितापुरता विचार करण्यापासून दूर नेतात आणि समाजाच्या व्यापक कल्याणाकडे पाहण्याची दृष्टी देतात. दुसऱ्याच्या अडचणींकडे दुर्लक्ष न करणे, मतभेद असतानाही संवाद साधणे, द्वेषाऐवजी संयमाचा मार्ग स्वीकारणे आणि अन्याय होताना मौन न बाळगणे ही या मूल्यांची व्यावहारिक रूपे आहेत. आजच्या स्पर्धात्मक जीवनात संपत्ती, पद आणि प्रतिष्ठा यांना मोठे महत्त्व दिले जाते. अशा परिस्थितीत प्रज्ञा आणि करुणेचा समन्वय व्यक्तीला अधिक संवेदनशील बनवू शकतो. माणसाच्या यशाचे मोजमाप केवळ त्याच्या वैयक्तिक संपत्तीवर न करता समाजासाठी त्याने केलेल्या योगदानावरही केले पाहिजे, अशी जाणीव या मूल्यांमधून निर्माण होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा भारतीय संविधानाशीही घनिष्ठ संबंध आहे. संविधानाने सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार दिला असून अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याची तरतूद केली आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाही जीवनाची मूलभूत मूल्ये आहेत. मात्र, कायद्याने समानता मान्य केली म्हणून समाजातील सर्व प्रकारचे भेदभाव आपोआप संपत नाहीत. जातीय पूर्वग्रह, सामाजिक बहिष्कार, आर्थिक शोषण आणि महिलांना दुय्यम स्थान देणाऱ्या प्रवृत्ती आजही विविध स्वरूपांत आढळतात. म्हणून संविधानाचा सन्मान करणे म्हणजे केवळ त्यातील तरतुदींची माहिती ठेवणे नव्हे, तर त्यातील मूल्ये प्रत्यक्ष जीवनात उतरविणे होय. सार्वजनिक ठिकाणी समानतेने वागणे, इतरांच्या अधिकारांचा आदर करणे, अन्यायाविरुद्ध कायदेशीर मार्गाने आवाज उठविणे आणि सामाजिक सलोखा टिकविणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. लोकशाहीची मजबुती केवळ शासनसंस्थांवर अवलंबून नसते; ती नागरिकांच्या वर्तनात आणि परस्पर संबंधांमध्येही प्रतिबिंबित झाली पाहिजे.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला स्वाभिमान, स्वावलंबन आणि सामाजिक प्रगतीशी जोडले. शिक्षणामुळे व्यक्तीला स्वतःच्या हक्कांची जाणीव होते, प्रश्न विचारण्याची क्षमता विकसित होते आणि रूढ समजुतींची चिकित्सा करता येते. शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळविणे किंवा रोजगार प्राप्त करणे एवढाच नसावा. वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिकता, सामाजिक संवेदनशीलता आणि लोकशाही मूल्ये विकसित करणे हेही शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक स्थितीच्या आधारावर भेदभाव होणार नाही, असे वातावरण निर्माण केले पाहिजे. वंचित विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, डिजिटल साधने आणि प्रगतीच्या समान संधी मिळणे आवश्यक आहे. ज्ञानामुळे व्यक्ती सक्षम होते; परंतु ज्ञानाबरोबर सामाजिक जबाबदारी विकसित झाली, तर शिक्षण समाजाच्या व्यापक कल्याणासाठी अधिक प्रभावी ठरते. समताधिष्ठित समाजनिर्मितीत स्त्री-पुरुष समानतेलाही महत्त्वाचे स्थान आहे. महिलांना शिक्षण, रोजगार, सुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळणे आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसा, हुंडा, बालविवाह, रोजगारातील भेदभाव आणि महिलांच्या मतांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती या समाजातील असमानतेच्या समस्या आहेत. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेद न करणे, घरातील जबाबदाऱ्या समानतेने वाटून घेणे, महिलांच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करणे आणि सार्वजनिक जीवनातील त्यांचा सहभाग वाढविणे ही प्रत्यक्ष परिवर्तनाची पावले आहेत. समतेचा स्वीकार करणारा समाज महिलांच्या अधिकारांकडे दुय्यम प्रश्न म्हणून पाहू शकत नाही. महिलांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगता येणे, त्यांच्या क्षमतांना वाव मिळणे आणि त्यांना स्वतःच्या आयुष्याविषयी निर्णय घेता येणे हे न्याय्य समाजाचे महत्त्वाचे लक्षण आहे. करुणा आणि समता ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवायची असतील, तर महिलांविषयीच्या सामाजिक दृष्टिकोनातही बदल घडवावा लागेल. आजच्या तंत्रज्ञानप्रधान काळात विवेकनिष्ठ विचारांची गरज अधिक वाढली आहे. सामाजिक माध्यमांवर माहितीचा वेग प्रचंड असला, तरी प्रत्येक माहिती सत्य असेलच असे नाही. अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणारे दावे समाजात गैरसमज निर्माण करू शकतात. अशा वेळी माहितीची सत्यता तपासणे, पुराव्यांच्या आधारे विचार करणे आणि मतभिन्नतेचा आदर राखणे आवश्यक आहे. दुसऱ्या व्यक्तीच्या श्रद्धेशी किंवा विचारांशी असहमती असली, तरी तिचा अपमान करणे योग्य नाही. संवाद आणि विवेकाच्या आधारे मतभेद सोडविण्याची संस्कृती लोकशाहीला बळकटी देते. बुद्धांचा विवेकनिष्ठ दृष्टिकोन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्यायाचा आग्रह स्वीकारल्यास समाजात जबाबदार चर्चा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सहिष्णुता वाढू शकते. तंत्रज्ञानाचा वापर ज्ञानाचा प्रसार, शैक्षणिक मदत आणि सामाजिक जागृतीसाठी केला, तर तो अधिक समताधिष्ठित समाजनिर्मितीचे साधन ठरू शकतो. धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करताना दीक्षाभूमीवरील कार्यक्रम, धम्मवंदना, व्याख्याने आणि सांस्कृतिक उपक्रमांना महत्त्व आहे. या कार्यक्रमांमुळे इतिहासाचे स्मरण होते आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळते. मात्र, या दिवसाचे महत्त्व केवळ सोहळ्यांपुरते मर्यादित ठेवता कामा नये. वाचनसंस्कृती वाढविणे, आरोग्यविषयक जनजागृती करणे, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रयत्न करणे आणि जातीय भेदभावाविरुद्ध संवाद घडविणे अशा उपक्रमांमधून धम्माचा सामाजिक आशय अधिक प्रभावीपणे व्यक्त होऊ शकतो. तरुणांनी बुद्धांच्या विचारांचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनाचा अभ्यास करून त्यांचा संबंध आजच्या सामाजिक प्रश्नांशी जोडला पाहिजे. इतिहासातील महान व्यक्तींचा गौरव करणे आवश्यक असले, तरी त्यांच्या विचारांनुसार वर्तमानातील समस्यांवर काम करणे अधिक महत्त्वाचे आहे. सामाजिक बांधिलकीतून उभे राहणारे उपक्रम धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या संदेशाला दैनंदिन जीवनाशी जोडतात.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा खरा संदेश समता, स्वाभिमान आणि मानवी प्रतिष्ठेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत आहे. समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी कायदे, शिक्षण, सामाजिक चळवळी आणि वैयक्तिक आचरण यांची सांगड घालणे आवश्यक आहे. समता ही घोषणेत नव्हे, तर व्यवहारात दिसली पाहिजे; बंधुता भाषणापुरती न राहता परस्परांच्या दुःखाची जाणीव ठेवणाऱ्या कृतींतून व्यक्त झाली पाहिजे; आणि विवेक हा केवळ चर्चेचा विषय न राहता निर्णयांचा आधार बनला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता येईल, प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळेल, महिलांना समान अधिकार मिळतील आणि जात-धर्माच्या भिंतींपलीकडे मानवी नात्यांची उभारणी होईल, असा समाज निर्माण करणे हीच या दिवसाची खरी प्रेरणा आहे. १४ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे स्मरण करताना आपण स्वतःच्या विचारांचे आणि वर्तनाचे परीक्षण करून प्रज्ञा, करुणा, समता आणि बंधुता या मूल्यांनुसार जगण्याचा संकल्प करूया. कारण धम्मचक्र प्रवर्तनाचा खरा अर्थ इतिहासातील परिवर्तनाचा गौरव करण्यातच नाही, तर त्या परिवर्तनाला आपल्या जीवनातून आणि सामाजिक कृतीतून पुढे नेण्यात आहे. या मूल्यांचा सातत्याने स्वीकार केला, तर अधिक न्याय्य, संवेदनशील आणि मानवी समाजाच्या निर्मितीचा मार्ग अधिक दृढ होईल.

(लेखक, समाजशास्त्र, पाली व बौद्ध साहित्याचे अभ्यासक आहेत)

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# चैत्र नवरात्रोत्सवापर्यंत माहूरच्या 'स्कायवॉक'चे काम पूर्ण होणार

## मुख्य अभियंत्या रूपा राऊळ गिरासे यांची माहिती



**सरफराज दोसानी**

माहूर:श्रीक्षेत्र माहूरगडा - वरील श्री रेणुका मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना मोठा दिलासा देणाऱ्या बहुप्रतीक्षित स्कायवॉक व लिफ्ट प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने कंबर कसली आहे. येत्या गुढीपाडव्यापर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, चैत्र नवरात्रोत्सवात हा प्रकल्प भाविकांच्या सेवेत सुरू करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक विभाग, नांदेडच्या मुख्य अभियंता रूपा राऊळ गिरासे यांनी दिली.

या प्रकल्पासाठी वन विभागासह विविध शासकीय विभागांच्या परवानग्या मिळविणे, तसेच स्थानिक व्यापाऱ्यांचे पुनर्वसन करून त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देणे, यासाठी विलंब झाला. त्यामुळे प्रत्यक्ष काम मार्च २०२४ मध्ये सुरू झाले. आता या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणा आणि कॅन्ट्राटदारांकडून प्रयत्न सुरू असल्याचे मुख्य अभियंता गिरासे यांनी स्पष्ट केले.

या प्रकल्पात दोन स्टेशन उभारण्यात येत असून, तेथून लिफ्टच्या माध्यमातून भाविकांना वरच्या स्तरावर जाता येणार आहे. त्यानंतर सुमारे ७५ मीटर लांबीच्या स्कायवॉकवरून चालत भाविकांना गडावरील अप्पर स्टेशनपर्यंत पोहोचता येईल. सद्यःस्थितीत अप्पर स्टेशनचे काम सुमारे ७० ते ७५ टक्के पूर्ण झाले असून, लोअर स्टेशनचे काम २० ते २५ टक्के पूर्ण झाले आहे. मधल्या स्कायवॉकचे कामही लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. उर्वरित कामाला गती देऊन निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांना कामाला लावण्यात आले आहे. गुढीपाडव्यापर्यंत काम पूर्ण करून चैत्र नवरात्रोत्सवात भाविकांसाठी हा प्रकल्प उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचे गिरासे यांनी सांगितले. गिरासे आज (बुधवार) रोजी माहूर गडावर आल्या होत्या. यावेळी त्यांचा समवेत भोकरचे कार्यकारी अभियंता विशाल चोपडे, माहूरचे उपविभागीय अभियंता देवराव भिसे, शाखा अभियंता आकाश राठोड, वॅपकॉसचे अभियंता कुणाल यादव, श्री रेणुका देवी संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी, विश्वस्त संजय कान्नव आणि व्यवस्थापक विजय राऊत उपस्थित होते.

## अपघातातील जखमी युवकाचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-अर्धापूर तालुक्यातील लोणी खु.येथील आकाश वाघमारे (वय २६) हा ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी शहापूर येथून पायी आपल्या गावाकडे जात असताना मागून आलेल्या भरधाव मोटार-सायकलने त्यास जोरदार धडक दिली. या अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यास तात्काळ उपचारासाठी नांदेड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तब्बल चार दिवसांनंतर १२ ऑक्टोबर रोजी त्याचा मृत्यू झाला. त्याच्या पश्चात आई, वडील आणि दोन भाऊ असा परिवार आहे.

# जिल्ह्यातील ५१ हजार ७२५ शेतकऱ्यांची कर्जमुक्तीची तिसरी यादी प्रसिद्ध

नांदेड/प्रतिनिधी-पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील ५१ हजार ७२५ पात्र शेतकऱ्यांची तिसरी यादी १२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी आपल्या कर्जखात्यावरील थकबाकीची खातरजमा करून नजीकच्या आपले सेवा केंद्रावर आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्ज तसेच पुनर्गठित व फेरपुनर्गठित कर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, त्यासाठी शासनाने महाआयटीची नियुक्ती केली आहे. नांदेड जिल्ह्यातील बँकांनी योजना पोर्टलवर एकूण २ लाख २४ हजार ८४७ थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. या माहितीचे संगणकीय प्रक्रियेद्वारे संस्करण करून महाआयटीने यापूर्वी २४ जुलै आणि ११ सप्टेंबर २०२६ रोजी पात्र शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या होत्या. त्यानंतर १२ ऑक्टोबर रोजी तिसरी यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तिसऱ्या यादीतील पात्र शेतकऱ्यांची नावे संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सहकारी संस्था आणि ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

कर्जमुक्तीचा लाभः यादीत समाविष्ट पात्र शेतकऱ्यांना योजनेच्या तरतुदीनुसार कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. थकबाकीची खातरजमाः पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावरील थकबाकी ३१ मार्च २०२६ रोजीच्या स्थितीनुसार निश्चित करण्यात आली आहे. १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज व इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी संबंधित बँकेकडून थकबाकीची खातरजमा करून घ्यावी. दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी : राष्ट्रीयीकृत व व्यापारी बँकांमधील काही पात्र शेतकऱ्यांची ३१ मार्च २०२६ रोजीची कर्जथकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा जास्त असली, तरी शासनाच्या हेअरकट धोरणानुसार संबंधित कर्जे निरंक करण्यात येणार आहेत.

# उपजिल्हा रुग्णालयातील डायलिसिस विभाग वीस दिवसांपासून ठप्प

मुखेड/प्रतिनिधी-येथील उपजिल्हा रुग्णालयातील डायलिसिस विभागातील दोन मशिन्स गेल्या वीस दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याने गरजू रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. आवश्यक साहित्य आणि फिल्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांना उपचारासाठी थेट नांदेड येथील खासगी रुग्णालयांचा रस्ता धरावा लागत असून, यामुळे त्यांच्यावर मोठा आर्थिक भुर्दंड पडत आहे.

तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर व आ. डॉ. तुषार राठोड यांच्या प्रयत्नांतून मुखेड येथे हा हायटेक तीन खाटांचा डायलिसिस विभाग सुरू करण्यात आला होता. या केंद्रात वैद्यकीय अधिकारी डॉ. विनया गोरे, परिचारिका लीना मोडक आणि कंत्राटी तंत्रज्ञ मन्मथ कुडके कार्यरत आहेत. मात्र, २५ सप्टेंबरपासून दोन मशिन्ससाठी लागणारे 'डायचेक', 'फिल्टर यू ९००० रियेजंट' आणि इतर आवश्यक साहित्य संपल्यामुळे या मशिन्स बंद पडल्या आहेत. याशिवाय, येथील वैद्यकीय अधिकारी नियमित उपस्थित राहत नसल्याची तक्रारही रुग्णांमधून केली जात आहे. या केंद्रात नियमित डायलिसिस घेणाऱ्या ८ रुग्णांपैकी ३ रुग्ण एचआयव्ही पॉझिटिव्ह असल्याने त्यांच्यासाठी राखीव असलेल्या एकाच बेडवर उपचार सुरू आहेत. मात्र, उर्वरित ५ रुग्णांना उपचारासाठी नांदेडला जावे लागत आहे. प्रवासात संपूर्ण दिवस खर्ची पडत असून, खासगी रुग्णालयातील महागड्या उपचारामुळे रुग्णांचे कुटुंब आर्थिक अडचणीत सापडले आहे.

# उस्मानशाही मिल सुरु करण्यासाठी औद्योगिक विकास परिषदेचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-उस्मानशाही मिल पुन्हा सुरू करण्याच्या मागणीसह नांदेडमधील शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांच्या प्रगतीसाठी उस्मानशाही मिल संवर्धन समितीच्या वतीने औद्योगिक विकास परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता के. शंकरराव चव्हाण सभागृह, नांदेड येथे ही परिषद होणार आहे.

उस्मानशाही मिल सुरू झाल्यास परिसरातील औद्योगिक विकासाला चालना मिळण्यासोबतच शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर मिल पुन्हा सुरू करण्यासाठी व्यापक जनसमर्थन उभे करणे, तसेच या प्रश्नावर चर्चा करून पुढील दिशा ठरविणे, हा परिषदेचा उद्देश आहे.या परिषदेला शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उस्मानशाही मिल संवर्धन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. परिषदेच्या आयोजनासाठी श्याम निलंगेकर, तरन्नुम मोहम्मद, प्रवीण जेठेवाड, बळवंत मोरे, प्रांजली रावणगावकर, किरण चिद्रावार, कॉ. प्रदीप नागापूरकर, यशवंत थोरात, सुभाष लोखंडे, मोईज खान, रोहन कहाळेकर आणि ललिता कुंभार हे पुढाकार घेत आहेत.

# आजचे विज्ञान प्रदर्शन भविष्याची दिशा ठरवेल-आ.श्रीजया चव्हाण




नांदेड/प्रतिनिधी-विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासह त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक वाटचालीला दिशा देण्यासाठी विज्ञान प्रदर्शन महत्त्वाचे आहे. विविध वैज्ञानिक प्रयोग व प्रकल्प पाहून विद्यार्थ्यांनी भविष्यातील करिअरची दिशा ठरवावी, असे आवाहन भोकरच्या आ.ॲड. श्रीजया चव्हाण यांनी केले.

सायन्स कॉलेजमध्ये शाळा ते महाविद्यालय या संकल्पनेवर आधारित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन उत्साहात झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष प्रयोगांतून समजून घ्याव्यात तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता व चॅटजीपीटीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा विधायक वापर करावा, असे आ.श्रीजया चव्हाण यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सी.ए. डॉ. प्रविण पाटील होते. प्रमुख उपस्थितीमध्ये नगरसेविका कु शांभवी प्रवीण साले यांचा समावेश होता. व्यासपीठावर प्राचार्य तथा प्रदर्शनाचे संयोजक डॉ. एल. पी. शिंदे, उपप्राचार्य डॉ. सौ. ए. आर. शुक्ला, उपप्राचार्य एकनाथ खिल्लारे आणि आयोजन सचिव डॉ. के. एस. शिळेवार उपस्थित होते. प्रा. डॉ. किरण शिळेवार यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रविण पाटील यांनी मोबाईलचा अनावश्यक वापर टाळून शैक्षणिक प्स व आधुनिक तंत्रज्ञानाचा ज्ञानवृद्धीसाठी उपयोग करण्याचे आवाहन केले.एकनाथ खिल्लारे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. व्ही. आर. मराठे यांनी आभार मानले. विज्ञान मंडळाचे सदस्य डॉ. व्ही. बी. चव्हाण, डॉ. व्ही. आर. मराठे, एस. आर. दुलेवाड, एस. एफ. गोरे, डॉ. सौ. एस. डी. वडजे आणि सौ. सीमा पांडे यांनी प्रदर्शनाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले. उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विविध विभाग, वैज्ञानिक प्रयोग, प्रकल्प आणि शैक्षणिक सुविधांची माहिती घेतली. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी घेतले सपत्नीक श्री रेणुकामातेचे दर्शन

माहूर/प्रतिनिधी-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मंगळवारी (दि.१३ ऑक्टोबर) सकाळी श्रीक्षेत्र माहूरगड येथे श्री रेणुका मातेचे दर्शन घेऊन सपत्निक आरती केली. यावेळी त्यांनी नवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने यात्रा व्यवस्थापनाचा आढावा घेतला. श्री रेणुका देवी संस्थानच्या विश्वस्त मंडळाने भाविकांसाठी केलेल्या विविध सोयी-सुविधा आणि नियोजनाचे कौतुक करत समाधान व्यक्त केले.

नवरात्रोत्सवासाठी संस्थानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची आणि भाविकांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची जिल्हाधिकारी कर्डिले यांनी माहिती घेतली. भाविकांच्या दर्शनाची संख्या जाणून घेण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दररोज किती भाविक दर्शन घेत आहेत, याचाही त्यांनी आढावा घेतला. भाविकांच्या सेवेसाठी संस्थानच्या वतीने १५० कर्मचारी तैनात करण्यात आले



असून, स्वच्छतेला विशेष प्राधान्य दिले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. जिल्ह्यातील विविध नगरपंचायतींची स्वच्छता पथके माहूर येथे भेट देऊन स्वच्छता व्यवस्थेत योगदान देत आहेत. तसेच भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी पार्किंगची व्यवस्था चोख ठेवण्यात आली असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. संस्थानने केलेल्या या व्यवस्थापनाबाबत त्यांनी समाधान व्यक्त करत विश्वस्त मंडळाचे अभिनंदन केले. नवरात्रोत्सवाच्या काळात श्री रेणुका मातेच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने माहूरगड येथे यावे. मात्र, दर्शन घेताना शांतता व शिस्त राखावी आणि यात्रा व्यवस्थापनासाठी प्रशासन व संस्थानला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी केले. यावेळी संस्थानचे सचिव तथा सहाय्यक जिल्हाधिकारी बी सरवण तहसीलदार तथा कोषध्यक्ष अभिजित जगताप यांच्या सह विश्वस्त उपस्थित होते.

# पाच हजारांचा पान मसाला,तंबाखूचा साठा जप्त

देगलूर/प्रतिनिधी-प्रतिबंधित पान मसाला आणि सुगंधित तंबाखूचा साठा करणाऱ्या विरुद्ध देगलूर डीपी पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

शहरातील नीलकमल बार समोरील सार्वजनिक रस्त्यावर सोमवार दि.१२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी डीबी पथकाने धडक कारवाई करत ४ हजार ९८४ रुपयाचा प्रतिबंधित मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे प्रतिबंधित पदार्थांचा व्यवहार करणाऱ्यांना पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे.नागेश निळकंठराव पाटील (वय ४८ रा. धनज ता. मुखेड) अशी आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यात सागर पान मसाला, एस आर-१ सुगंधित तंबाखू, विमल पान मसाला व्ही-१ तंबाखू असे शासनाने प्रतिबंधित केलेले पदार्थ आढळून आले. पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त केला.याप्रकरणी डीबी पथकातील शेख अब्दुल बारी यांच्या फिर्यादीवरून देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वीजबिल तीनशे रुपये,दंड मात्र ३ हजार ९०० रुपये

## वीज वितरण कंपनीच्या कारभाराविरोधात ग्राहकांचा संताप

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यात वीज वितरण कंपनीच्या वीजबिल आकारणीवरून ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. घरगुती वीजबिलाची रक्कम तीनशे ते सातशे रुपयांच्या दरम्यान असताना बिल थकीत राहिल्यामुळे दंड व इतर शुल्कांच्या नावाखाली ३ हजार ९०० रुपयांपेक्षाही अधिक रक्कम आकारली जात असल्याचा आरोप ग्राहकांकडून केला जात आहे. या प्रकारामुळे सर्वसामान्य वीजग्राहक आर्थिक अडचणीत सापडले असून, वीज वितरण कंपनीच्या कारभाराबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

तालुक्यातील अनेक घरगुती ग्राहकांना कमी रकमेची वीजबिले मिळत असली, तरी ती वेळेत न भरल्यास त्यावर मोठ्या प्रमाणात दंड व इतर शुल्क आकारले जात असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. मूळ वीजबिलाच्या तुलनेत अतिरिक्त आकारणी मोठी असल्याने ग्राहकांमध्ये संभ्रम आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित आकारणी नेमकी कोणत्या नियमानुसार केली जात आहे, याचा स्पष्ट खुलासा वीज वितरण कंपनीने करावा, अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे. विशेष म्हणजे, काही ग्राहकांनी वीजजोडणी बंद करण्याची मागणी करूनही त्यांची वीजजोडणी बंद केली जात नसल्याचा आरोप आहे. असे असतानाही संबंधित ग्राहकांना वीजबिले पाठवली जात असल्याचे सांगण्यात येत आहे. एका ग्राहकाचे सुमारे तीन वर्षांपूर्वी वीजमीटर काढून नेण्यात आले होते; मात्र त्यानंतरही त्या ग्राहकाला वीजबिले पाठवली जात असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष वीजवापर नसताना किंवा वीजमीटर काढून नेल्यानंतरही बिलांची आकारणी कशाच्या आधारे केली जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# हर्षा डोरले यांचा पोलीस अधीक्षकांकडून गौरव



हदगाव/प्रतिनिधी-हदगाव पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलीस अंमलदार हर्षा देवबा डोरले यांनी नांदेड पोलीस मुख्यालयात आयोजित फायरिंग प्रशिक्षणात द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या कामगिरीबद्दल नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी त्यांचे अभिनंदन करून गौरव केला.

नांदेड येथील पोलीस मुख्यालयात ७ व ८ ऑक्टोबर २०२६ रोजी फायरिंग प्रशिक्षण सत्र क्रमांक ४९ आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणात हर्षा डोरले यांनी उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळविला. त्यांच्या या यशामुळे हदगाव पोलीस ठाण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. हर्षा डोरले यांच्या कामगिरीची दखल घेत पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी त्यांचे कौतुक केले. भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी करून पोलीस दलाचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

